# बाजरी–लागवड तंत्रज्ञान

जमीन : बाजरी पिकासाठी पाण्याचा उत्तम निचरा होणारी हलकी ते मध्यम जमीन निवडावी . जमिनीचा सामु हा ६.२ ते ८ असावा . हलकया जमिनीत बाजरी हे पिक घ्यावयाचे असल्यास सरी–वरंबा पध्दत फायदेशीर ठरते.

पूर्व मशागत : जमिनीची १५ सें. मी. पर्यत खोल नांगरट करावी. त्यानंतर कुळवाच्या दोन पाळया देऊन जमिन भुसभुसीत करावी. शेवटच्या कुळवणी अगोदर प्रति हेक्टरी ५ टन / १० ते १५ गाडया शेणखत किंवा कपोस्ट खत शेतात पसरावे व नंतर कुळवणी करावी.

पेरणीची वेळ : १५ जुन ते १५ जुलै

बियाण्याचे प्रमाण : ३ ते ४ किलो प्रति हेक्टर

बीजप्रक्रिया :

अ) २० टक्के मिठाच्या द्रावणाची बीजप्रक्रिया (अरगट रोगासाठी) : बीजप्रक्रिया केलेले प्रमाणित बियाणे उपलब्ध नसल्यास पेरणीपूर्वी बियाण्यास २० टक्के मिठाच्या द्रावणाची प्रक्रिया करावी. त्यासाठी १० लिटर पाण्यात २ किलो मिठ विरघळावे. पाण्यावर तरंगणारे बुरशी युक्त हलके बियाणे बाजुला काढून त्याचा नाश करावा व तळाला असलेले निरोगी आणि वजनाने जड असलेले बियाणे वेगळे करुन पाण्याने २ ते ३ वेळा धुवावे त्यानंतर सावलीत वाळवून पेरणीसाठी वापरावे.

ब) मेटॅलॅक्झील ३५ डब्ल्यु.एस. ( ॲप्रॅान ) बीजप्रक्रिया (गोसावी रोगासाठी) : पेरणीपूर्वी बियाण्यास ६ ग्रॅमेटॅलॅक्झील ३५ एसडी ( ॲप्रॅान ) प्रति किलो बियाण्यास चोळून नंतर पेरणी करावी.

क) अझोस्पिरीलम व स्फुरद विरघळविणारे जिवाणू संवर्धनाचा बीजप्रक्रिया : २५ ग्रॅ अझोस्पिरीलम प्रति किलो बियाण्यास चोळून पेरणी करावी. त्यामुळे २० ते २५ टक्के नत्र खताची बचत होऊन उत्पादनात १० टक्के वाढ होते. तसेच स्फुरद विरघळविणारे जिवाणूची २५ ग्रॅ प्रति किलो बियाणे या प्रमाणात बीजप्रक्रिया करावी.

पेरणीचे अंतर : कोरडवाहू क्षेत्रात दोन ओळीत ४५से. मी. आणि दोन रोपामध्ये १५ से. मी. अंतर ठेवावे (हेकटरी सुमारे २.२२ लाख रोपे ), नियमीत पावसाच्या ठिकाणी अथवा पाण्याची सोय असेल तेथे ३०×१५ से. मी. अंतरावर पेरणी करावी.

पेरणीची पध्दत : पेरणी सरी–वरंबा (थेंब थेंब संचय पध्दत) किंवा सपाट वाफे पध्दतीने करावी. पेरणी २ ते ३ से. मी. पेक्षा जास्त खोलीवर करु नये.

आंतरपीक : हलक्या जमिनीत बाजरी + मटकी, तर मध्यम जमिनीत बाजरी + तूर (२:१ या प्रमाणात) आंतरपीक घ्यावे. दोन ओळीत ३० से. मी. अंतर ठेवावे.

विरळणी : १० दिवसांनी पहिली व २० दिवसांनी दुसरी विरळणी करुन दोन रोपातील अंतर १५ सें.मी. ठेवावे.

रासायनिक खते : ४० किलो नत्र , २०किलो स्फुरद आणि २० किलो पालाश हलक्या जमिनीत तर मध्यम जमिनीत ५० किलो नत्र, २५ किलो स्फुरद आणि २५ किलो पालाश प्रति हेक्टरी. पेरणीच्या वेळी अर्धा नत्र व संपूर्ण स्फुरद व पालाश आणि २५ ते ३० दिवसांनी उर्वरीत अर्धा नत्र (जमिनीत ओलावा असतांना ) द्यावा. रासायनिक खते दोन चाडीच्या पाभरीने पेरुन द्यावीत.

आंतरमशागत : दोन वेळा कोळपणी आणि गरजेनूसार एक ते दोन वेळा खुरपणी करावी.पेरणी केल्यापासून सुरूवातीचे ३० दिवस शेत तण विरहीत ठेवणे अत्यंत गरजेचे आहे कारण याच कालावधीत तण व पिक यांच्यात हवा, पाणी, अन्नद्रव्ये आणि सुर्यप्रकाश मिळविण्यासाठी स्पर्धा होत असते . एकात्मिक तण नियंत्रण पध्दतीमध्ये अॅट्राझिन तणनाशकाची १.० किलो प्रति हेकटरी पेरणीनंतर परंतु पीक उगवण्यापूर्वी ५०० लिटर पाण्यात मिसळुन µफवारणी करावी व एक खुरपणी

पेरणीनंतर २५–३०दिवसांच्या आत करावी.

पाणी व्यवस्थापन : बाजरी हे कोरडवाहुचे पीक आहे. पंरतु पाण्याचा ताण पडल्यास व पाणी उपलब्ध असल्यास खालील संवेधनक्षम अवस्थेत पाणी दिल्यास अधिक उत्पादन मिळू शकते. पहिले पाणी फुटवे येण्याच्या वेळी (पेरणीनंतर २० ते २५ दिवसांनी), दुसरे पाणी पीक पोटरीत असतांना (पेरणीनंतर ३५ ते ४५ दिवसांनी) आणि तिसरे पाणी दाणे भरते वेळी (पेरणीनंतर ६० ते ६५ दिवसांनी ) द्यावे.

पीक संरक्षण

केवडा किंवा गोसावी :

१. पीक २० ते २१ दिवसांचे झाल्यावर रोगट झाडे उपटून टाकावी.

२. गोसावी किंवा केवडा रोगग्रस्त शेतात पुन्हा बाजरी घेऊ नये.

३. रोगास बळी न पडणारे वाण वापरावेत.

अरगट

१. २० टक्के मिठाच्या द्रावणाची बीजप्रक्रिया करावी.

२. उशीरा पेरणी करु नये,रोगट झाडे उपटुन नष्ट करावीत.

३. खोल नांगरट व पिकाची फेरपालट करावी.

## बाजरी पिकाच्या मागील दहा वर्षात प्रसारीत केलेल्या शिफारशी

| बाजरी | | |
|---|---|---|
| २०१७-१८ | १ | उशिरा मान्सून आगमनाच्या परिस्थितीत खरीप बाजरी पिकाच्या धनशक्ती वाणाची पेरणी उशीरात उशिरा म्हणजेच २० ऑगस्ट ते ०२ सप्टेंबर (मघा नक्षत्र) (कृषि हवामान आठवडा क्र. ३४-३५) दरम्यान महाराष्ट्राच्या अवर्षण प्रवण विभागातील मध्यम खोल जमिनीमध्ये शाश्वत उत्पादनासाठी करण्याची शिफारस करण्यात आली आहे. |
| २०१३-१४ | २ | पश्चिम महाराष्ट्रात उन्हाळी बाजरीपासून चारा व धान्याचे अधिक उत्पन्न, आर्थिक फायदा व पाणी वापर क्षमता मिळण्यासाठी उन्हाळी बाजरीची पेरणी ५ ते २५ फेब्रुवारीच्या दरम्यान करुन १५-२० दिवसांच्या अंतराने (१५० मि.मी. बाष्पीभवन झाल्यावर) ७ सें.मी. खोलीचे पाणी देण्याची शिफारस करण्यात येत आहे. |
| २०१२-१३ | ३ | मध्यम काळ्या जमिनीत उन्हाळी बाजरीच्या शांती या संकरीत वाणाचे अधिक उत्पादन मिळविण्याकरीता १ जानेवारी ते ४ फेब्रुवारी पर्यत (१ ला, ३ रा व ५ व्या हवामान आठवड्यापर्यंत) पेरणी करण्याची तसेच हेक्टरी ५ टन शेणखत आणि ९० किलो नत्र, ४५ किलो स्फुरद, ४५ किलो पालाश देण्याची आणि पेरणीपुर्वी ॲझोस्पिरीलम व पीएसबी प्रत्येकी २५ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास बीजप्रक्रिया करण्याची शिफारस करण्यात आलेली आहे. |
| २००९-१० | ४ | खरीप बाजरी आणि रब्बी सूर्यफुलाचे अधिक उत्पादन मिळविण्यासाठी खरीप बाजरीला ५ टन शेणखत + ६० किलो नत्र +३० किलो स्फुरद + ३० किलो पालाश प्रति हेक्टरी आणि रब्बी सुर्यफुलास ६० किलो नत्र +३० किलो स्फुरद + ३० किलो पालाश + २०० किलो जिप्सम + १० किलो झिंक सल्फेट प्रति हेक्टरी खरीप बाजरी – रब्बी सुर्यफुल या पीक पद्धतीसाठी देण्याची शिफारस धुळे विभागातील मध्यम काळ्या जमिनीसाठी करण्यात येत आहे. |
| २००८-०९ | ५ | बाजरी धान्याच्या अधिक उत्पादनासाठी बियाणास फेरस सल्फेट ३०० मिली ग्रॅम /किलोग्रॅम बिजप्रक्रिया करुन पेरणी करावी अशी शिफारस करण्यात येते. |